Harikisan Jajoo Education Sanstha Yavatmal.

# COLLEGE OF MANAGEMENT AND COMPUTER SCIENCE, YAVATMAL.

( NAAC ACCREDITED And Affiliated to Santa Gadge Baba Amravati University, Amravati)

Address :- 13/4 (A), Behind Naringe Nagar, Dhamangaon Road, Yavatmal - 445001 (M.S.)

www.cmcs.hjes.in cmcs457@sgbau.ac.in 94231-31946

Ref. No. 2724 Date :-

## BBA Fee Structure A.Y.2026-27

### Institute Code – MB1106

**Interim Fee Structure for the BBA**

**As per the Minutes of the 27th Meeting of the Fees Regulating Authority, Mumbai (17th July 2026)**
**Fees given by the Sant Gadge Baba Amravati University, Amravati**
**(Notification No. 224/2025 Dated 21st November 2025)**

| Sr.No. | Description | Fees | Total Fees |
|---|---|---|---|
| 1 | Tuition Fee | 23,500/- | |
| 2 | Development Fee | - | |
| 3 | Management Fee | - | |
| 4 | NRI Seat Fees | - | |
| 5 | Against NRI Seat Fees | - | 33,021/- |
| 6 | Caution Money/ Deposit (1 Time) | - | |
| 7 | Other Fees by SGBAU Under 16 heads mentioned in Government of Maharashtra G. R. No.अजाशि–२०१९/प्र.क्र. ३४५/शिक्षण–१दिनांक १५ जानेवारी, २०२० | 9,521/- | |

***This Fees is subject to change by Fees Regulating Authority, Mumbai***

Principal
College of Management and
Computer Science, Yavatmal.

PRINCIPAL
College Of Management And
Computer Science,Yavatmal

Harikisan Jajoo Education Sanstha Yavatmal.
# COLLEGE OF MANAGEMENT AND COMPUTER SCIENCE, YAVATMAL.
( NAAC ACCREDITED And Affiliated to Santa Gadge Baba Amravati University, Amravati)
Address :- 13/4 (A), Behind Naringe Nagar, Dhamangaon Road, Yavatmal - 445001 (M.S.)
www.cmcs.hjes.in cmcs457@sgbau.ac.in 94231-31946

Ref. No. 2725 Date :-

## बी.बी.ए. शुल्क विभागणी २०२६-२७

### डीटीई कोड - एमबी ११०६

### बी.बी.ए. साठी अंतरिम शुल्क रचना

शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या २७ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार (१७ जुलै २०२६)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (SGBAU) यांनी निश्चित केलेले शुल्क
(अधिसूचना क्र.२२४/२०२५, दिनांक २१ नोव्हेंबर २०२५)

| अ.क्र. | विवरण | शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क | २३,५००/- | ३३,०२१/- |
| २ | विकास शुल्क | - | |
| ३ | व्यवस्थापन कोटा शुल्क | - | |
| ४ | अनिवासी भारतीय जागा शुल्क | - | |
| ५ | अनिवासी भारतीय विरुद्ध जागा शुल्क | - | |
| ६ | सावधगिरीचे पैसे / ठेव | - | |
| ७ | महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र.अजा शि-२०१९१-शिक्षण/३४५ .क्र.प्र/, दिनांक १५ जानेवारी २०२० मध्ये नमूद केलेल्या १६ बाबींअंतर्गत SGBAU द्वारे आकारले जाणारे इतर शुल्क. | ९,५२१/- | |

***This Fees is subject to change by Fees Regulating Authority, Mumbai***

प्राचार्य
PRINCIPAL
कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड
College Of Management And
कॉम्प्युटर सायन्स, यवतमाळ
Computer Science, Yavatmal

Harikisan Jajoo Education Sanstha Yavatmal.
COLLEGE OF MANAGEMENT AND
CMCS COMPUTER SCIENCE, YAVATMAL.
( NAAC ACCREDITED And Affiliated to Santa Gadge Baba Amravati University, Amravati)
Address :- 13/4 (A), Behind Naringe Nagar, Dhamangaon Road, Yavatmal - 445001 (M.S.)
www.cmcs.hjes.in cmcs457@sgbau.ac.in 94231-31946

Ref. No. 2726 Date :-

## बी.बी.ए. फीस रो विभाजन 2026-27

### डीटीई कोड - एमबी 1106

### बी.बी.ए. रै वास्तै अंतरिम शुल्क संरचना

शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई री 27 वीं बैठक रै कार्यवाही रै अनुसार (17 जुलाई 2026)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (SGBAU) द्वारा दी गई फीस

(सूचना संख्या 224/2025 दिनांक 21 नवम्बर 2025)

| क्र.सं. | बिस्तार | शुल्क | कुल शुल्क |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षा शुल्क | 23,500/- | 33,021/- |
| 2 | विकास शुल्क | - | |
| 3 | प्रबंधन कोटा शुल्क | - | |
| 4 | गैर आवासीय भारतीय कोटा शुल्क | - | |
| 5 | गैर आवासीय भारतीय विरुद्ध कोटा शुल्क | - | |
| 6 | सावधानी धन/जमा | - | |
| 7 | Other Fees by SGBAU Under 16 heads mentioned in Government of Maharashtra G.R. No.अजाशि–२०१९/प्र.क्र. ३४५/शिक्षण–१दिनांक १५ जानेवारी, २०२० | 9,521/- | |

***This Fees is subject to change by Fees Regulating Authority, Mumbai***

प्राचार्य
PRINCIPAL
कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर सायन्स, यवतमाळ
College Of Management and Computer Science, Yavatmal

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेल: fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ: www.mahafra.org
दूरध्वनी: ०२२-३१५८०२४८ / मोबाईल क्र.८८२८७८६२६४

## २७ व्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त

दिनांक : १७ जुलै, २०२६

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११ (२)(३)(४) या मजकुराऐवजी सुधारणा अधिनियम, २०२६ अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची बैठक दि.१७ जुलै, २०२६ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री. समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि)<br>अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | श्री.नितीन बापुराव चव्हाण<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ३ | श्री.अतुल दामोदर धारप<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ५ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ६ | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण<br>प्रतिनिधी डॉ दिनकर वेकन (ओएसडी) महाराष्ट्राच्या वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयात | उपस्थित |
| ७ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ८ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ९ | श्री समीर कुर्तकोटी, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Scanned with OKEN Scanner

विषय क्र.१: दिनांक १३ जुलै २०२६ रोजी झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

"चर्चा झाली.

दि. १३ जुलै २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि मंजूर झाले".

विषय क्र.२: शुल्क निश्चितीसाठी प्रलंबीत असणा-या प्रस्तावांवर अंतरिम शुल्क (Interim fee) निश्चित करुन जाहीर करणे.

"चर्चा झाली.

प्रवेश प्रक्रिया व शैक्षणिक वर्ष लवकरच सुरू होत असल्याने, महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) सुधारणा अधिनियम, २०२६, कलम १४(२) मधील तरतुदीनुसार, ज्या शैक्षणिक संस्थांच्या शुल्क निश्चिती प्रस्तावांवर प्राधिकरणाचा अद्याप पर्यंत अंतिम निर्णय झालेला नाही, अशा संस्थांचा अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मंजूर/ प्रमाणित असलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अंतरिम शुल्क (Interim fee) म्हणून आकारण्यास संबंधित संस्थांना मंजुरी देण्यात येत आहे.

प्राधिकरणाकडून संबंधित संस्थेचे अंतिम शुल्क निश्चित करून जाहीर झाल्यानंतर ते शुल्क तात्काळ लागू राहील. जर अंतिम मंजूर शुल्क हे अंतरिम शुल्कापेक्षा कमी असल्यास, संस्थेने विद्यार्थ्यांकडून आकारलेली जास्तीची शुल्काची रक्कम कोणत्याही विलंबाशिवाय संबंधित विद्यार्थ्यांना परत करावी. तसेच, प्राधिकरणाकडून शुल्काबाबतचा अंतिम शुल्काचा निर्णय जाहीर होताच, संबंधित शैक्षणिक वर्षासाठी निश्चित करण्यात आलेले अंतिम शुल्क संस्थेस त्वरित लागू राहील.

सदर अंतरिम शुल्काची संस्था व अभ्यासक्रमनिहाय यादी या ठरावास परिशिष्ट म्हणून जोडण्यात आलेली आहे.

संबंधित सर्व शैक्षणिक संस्थांनी या निर्णयाची माहिती विद्यार्थी, पालक तसेच इतर हितसंबंधित धारकांना योग्य त्या माध्यमातून तात्काळ अवगत करावी".

विषय क्र.३: नवीन अभ्यासक्रमांसाठी तदर्थ शुल्क (Ad-hoc fee) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी निश्चित करुन जाहीर करणे.

"चर्चा झाली.

सदर विषयावरील पुढील विचारासाठी तो पुढील बैठकीपर्यंत पुढे ढकलण्यात आला".

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Scanned with OKEN Scanne

विषय क्र.४: शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी शुल्क निर्धारणाचा प्रस्ताव ऑनलाईन **(online)** सादर करण्याची प्रक्रिया सुरु करणे.

"चर्चा झाली.

शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी शुल्क निश्चिती प्रस्ताव सादर करण्यासाठीची ऑनलाइन प्रणाली दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी सुरू करण्यात येईल व ती दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कार्यरत राहील.

तसेच ऑनलाइन पद्धतीने प्रस्ताव सादर केल्यानंतर, सदर प्रस्तावाची छापील प्रत (Hard Copy) ऑनलाइन प्रस्ताव सादर केलेल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत संबंधित कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांनी विहित कालावधीत आपले शुल्क निश्चिती प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह तयार करून ऑनलाइन प्रणालीद्वारे सादर करावेत.

प्रस्ताव सादर करण्याच्या प्रक्रियेबाबत संस्थांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने दिनांक ६ सप्टेंबर २०२६ ते १४ सप्टेंबर २०२६ रोजी अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. या प्रशिक्षणामध्ये प्रस्ताव तयार करणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे तसेच प्रस्ताव सादर करण्याच्या प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल.

प्रस्तावांवर वेळेत कार्यवाही करून त्याबाबतचा अंतिम निर्णय नियोजित कालावधीत घेता यावा यासाठी सर्व संस्थांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता आपले प्रस्ताव शक्य तितक्या लवकर सादर करावेत.

शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी शुल्क निश्चिती प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सुरळीत व सुलभपणे पार पाडता यावी, यासाठी १५ सप्टेंबर २०२६ रोजी पासून विशेष 'हेल्पलाइन' सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल".

विषय क्र.५: शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी शुल्काच्या मंजूरीच्या प्रस्तावांवर विचार करणे.

"चर्चा झाली.

प्रस्तावांची छाननी आणि लेखापरीक्षित आर्थिक विवरणपत्रे व संबंधित प्रस्तावाच्या समर्थनार्थ सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतल्यानंतर, खाली नमूद केलेल्या संस्था/महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमनिहाय वाजवी शुल्कास खालीलप्रमाणे अंतिम स्वरुप देण्यात आले आहे.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Scanned with OKEN Scanner

सूचना:

अ) कलम २ या पोटकलम (छ) अन्वये "शुल्क" याचा अर्थ, शुल्क म्हणून निश्चित करण्यात आलेली रक्कम असा आहे आणि त्यामध्ये, शिकवणी शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, परीक्षा शुल्क, विकास शुल्क अथवा कोणत्याही अभ्यासानुवर्ती किंवा सह-अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांकरिता देय असलेली रक्कम, प्रयोगशाळा शुल्क, माहिती पुस्तिका शुल्क आणि विद्यार्थ्यांकडून गोळा केलेली, अन्य कोणतीही रक्कम म्हणजेच एखाद्या खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेत एखाद्या व्यावसायिक पाठयक्रमाला प्रवेश दिलेल्या कोणत्याही उमेदवाराकडून, कोणत्याही प्रयोजनासाठी अशा संस्थेला देय असलेली रक्कम - मग ती कोणत्याही नावाने संबोधली जाणारी आणि कोणत्याही रीतीने स्वीकारलेली असो - यांचा समावेश होतो, परंतु त्यामध्ये कोणत्याही वैकल्पिक वसतिगृह-निवासव्यवस्था, भोजनालय आकार आणि विद्यार्थी विमा शुल्क यांचा समावेश होणार नाही. तसेच, 'महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम' मधील २०२६ च्या सुधारणा कायद्यानुसार, अनुक्रमांक ३ वर; मूळ कायद्याच्या कलम २ मध्ये,नमूद केले आहे.

आ) संस्था/महाविद्यालये शुल्क नियामक प्राधिकरणाने (Fees Regulation Authority) मंजूर केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणतेही शुल्क आकारण्यास पात्र असणार नाहीत.

इ) जर कोणत्याही संस्थेने प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारले, तर संबंधित विद्यार्थ्याला/विद्यार्थ्यांना अतिरिक्त रक्कम परत करण्याच्या आदेशाव्यतिरिक्त, त्या संस्थेचे प्राचार्य आणि ती संस्था चालवणारे व्यवस्थापन हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ (ज्यामध्ये आता महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम २०२६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक VII सन २०२६) द्वारे सुधारणा करण्यात आली आहे आणि ज्याचा कलम २० अन्वये विहित केलेल्या दंडात्मक कारवाईस पात्र असतील.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

ई) शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी मंजूर केलेली शुल्क आकारणी संपूर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लागू राहील.

Scanned with OKEN Scanner

उ) संस्था/महाविद्यालय कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून एका शैक्षणिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी शुल्क आकारणार नाही किंवा वसूल करणार नाही. जर एका शैक्षणिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी विद्यार्थ्यांकडून शुल्क मागितले, आकारले किंवा वसूल केले गेले तर संबंधित संस्था/महाविद्यालय ही उक्त सुधारित अधिनियम २०२६ च्या कलम २० अन्वये दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

ऊ) कोणत्याही संस्थेने किंवा महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना वसतिगृह, मेस, वाहतूक आणि विद्यार्थी विमा या सारख्या सुविधा घेण्याबाबत सक्ती करू नये. जर विद्यार्थ्यांनी अशा कोणत्याही इच्छुक सुविधेचा/सुविधांचा लाभ घेण्याचा निर्णय घेतला तर संस्था किंवा महाविद्यालय त्यासाठी वाजवी शुल्क आकारू शकते. अशा इच्छुक सुविधा पुरवण्यासाठी झालेला खर्च हा मंजूर शुल्काचा भाग असणार नाही, तसेच या बाबीवर झालेला कोणताही खर्च मान्य खर्च (admissible expenditure) म्हणून दावा केला जाणार नाही.

ए) जर प्राधिकरणाने मंजूर केलेली शुल्क आकारणी एखाद्या संस्थेला/महाविद्यालयाला मान्य नसेल, तर ती संस्था प्राधिकरणाच्या निर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज करू शकते. अशा अर्जामध्ये निर्णयाच्या पुनर्विलोकनाची मागणी करण्यामागची कारणे स्पष्ट करणे आवश्यक आहे. पुनर्विलोकनाचा हा अर्ज प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्काबाबतची माहिती संबंधित संस्थेला/महाविद्यालयाला कळविल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (Fees Regulation Authority) कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे.

ऐ) पुनर्विलोकन अर्ज (Review Application) सादर करताना प्रति अभ्यासक्रम ५०,०००/- रुपये प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे. पुनर्विलोकन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या मुदतीनंतर आणि/किंवा प्रक्रिया शुल्क न भरता सादर केलेले अर्ज फेटाळले जाऊ शकतात.

दिनांक : १७ जुले, २०२६
ठिकाण : मुंबई

(समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि.))
अध्यक्ष(अतिरिक्त कार्यभार)
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

| Sr. No | Inst ID | Inst Name | Stream |
|---|---|---|---|
| 72 | BCA16291 | NIVRUTTI BABAJI NAVALE COLLEGE OF COMMERCE AND SCIENCE ,Taluka- Mawal | BBA |
| 73 | MB4111 | Sau. Leena Kishor Mamidwar Institute of Management Studies & Research, Kosara, Chandrapur ,CHANDRAPUR ,Taluka- Chandrapur | BBA |
| 74 | BCA16246 | SAMARTH COLLEGE OF COMPUTER SCIENCE ,Taluka- Junnar | BBA |
| 75 | BCA04719 | ST FRANCIS DE SALES COLLEGE ,Taluka- Nagpur (Urban) | BBA |
| 76 | BBA16211 | DESHBHAKTA RATNAPPA KUMBHAR COLLEGE OF COMMERCE KOLHAPUR ,Taluka- Karvir | BBA |
| 77 | BCA05620 | KRT ARTS BH COMMERCE AND AM SCIENCE COLLEGE NASHIK ,Taluka- Nashik | BBA |
| 78 | MB6775 | YES- INTERNATIONAL INSTITUTE OF MANAGEMENT SCIENCE ,Taluka- Haveli | BBA |
| 79 | MB1106 | Hari Kishan Jaju Education Sanstha's,College of Management & Computer Science, Yavatmal ,YAVATMAL ,Taluka- Yavatmal | BBA |
| 80 | BBA16282 | ARIHANT COLLEGE OF ARTS COMMERCE AND SCIENCE ,Taluka- Mulshi | BBA |
| 81 | BCA16153 | MUDHOJI COLLEGE PHALTAN ,Taluka- Phaltan | BBA |
| 82 | MB02664 | Deogiri College ,Taluka- Chhatrapati Sambhaji Nagar | BBA |
| 83 | BBA4722 | Rajmal Puglia Institute of Management and Technology Chandrapur ,Taluka- Chandrapur | BBA |
| 84 | MC01314 | Smt. Radhadevi Goenka College for Women, Akola ,Taluka- Akola | BBA |
| 85 | EN6758 | SAHYADRI VALLEY COLLEGE OF ENGG & TECH ,Taluka- Junnar | BBA |
| 86 | MC1113 | Sadhana Shikshan Mandal, Saraswati College, Shegaon ,SHEGAON ,Taluka- Shegaon | BBA |
| 87 | BBA04734 | RAMKRISHNA WAGH COLLEGE OF ARTS AND COMMERCE ,Taluka- Nagpur (Rural) | BBA |
| 88 | MB5101 | Khandesh College Education Society's Institute of Management & Research, Jalgaon ,JALGAON ,Taluka- Jalgaon | BBA |
| 89 | EN4138 | Jaidev Education Society's, J. D. College of Engineering, At. Khandala, Post : Valni, Katol Road,Nagpur ,NAGPUR ,Taluka- Nagpur (Urban) | BBA |

Fees Regulating Authority Maharashtra State